# वसंतराव नाईक कृषिभूषण २०१३

## श्री.रमेश बाबाजीराव देशमुख

### मु. काराव, पो. वांगणी, ता. अंबरनाथ, जि.ठाणे



- प्रत्येक वर्षी जमिनीची बांध-बंदिस्ती करुन उताराच्या जमिनीवर काजू, आंबा, चिकु, आवळा या फळझाडांची लागवड.
- बांधावर साग, ॲकेशिया, बांबु, गिरीपुष्प या वनझाडांची लागवड करुन मृद संधारण तसेच जलसंधारणासाठी शेतात शेततळे.
- कृषि मालावर आधारित गृह उद्योगाचे महिलांना प्रशिक्षण.
- कृषि स्वयंसहाय्यता गटाची स्थापना करुन शेतक-यांना मार्गदर्शन.
- उल्हास नदीच्या लाभलेल्या किना-यामुळे महाराष्ट्र स्टेट ॲग्री ॲण्ड रुरल टुरिझम को ऑफ फेडरेशन लिमिटेड यांचेकडून पर्यटन केंद्र म्हणून मान्यता.
- तेजस्विनी रत्न २००९ पुरस्कार, समाजभूषण पुरस्कार, कर्तृत्वगौरव पुरस्कार, आदर्श शेती व्यवसाय पुरस्कार अशा पुरस्कारांनी गौरवित.

३

# वसंतराव नाईक कृषिभूषण २०१३

## श्री. शरदराव पुंडलिकराव पा.ढोकरे

### मु. पो. खेडगाव, ता. दिंडोरी, जि. नाशिक



- एकूण २.६४ हे. क्षेत्र, संपूर्ण खडकाळ जमिनीवर गावतळयातील गाळ टाकल्यामुळे जमीन भुसभुशीत होऊन जमीनीचा पोत सुधारण्यास मदत.
- विविध कृषि विद्यापीठांचे प्रक्षेत्र, द्राक्ष संशोधन केंद्र तसेच इस्त्राइल, चायना, जर्मनी या देशांच्या अभ्यास दौ-यात सहभागी होऊन आधुनिक शेतीचे स्वप्न साकार करण्याकरीता आधुनिक ज्ञान व माहितीचे संपादन.
- शेतीसाठी लागणारे कंपोस्ट खत स्वतः तयार करुन शेतीत वापर व हलक्या जमिनीवर सुबाभूळ, निलगिरी, साग, आंबा, नारळ यांची लागवड.
- १५१ फूट लांब ११५ फूट रुंद व २४ फूट खोल असा रिझर्व टँक खोदल्याने पावसाळयात वाहून जाणारे पाणी एकत्र करण्याची उत्तम सुविधा.
- आधुनिक पध्दतीने द्राक्षाची लागवड केली असून द्राक्षाच्या पानांचे व देठांचे प्रयोगशाळेत पृथक्करण करुन द्राक्ष फवारणी व खताचे नियोजन.
- शेतीला पूरक व्यवसाय म्हणून कुक्कुटपालन व दुग्धव्यवसाय.

४

# वसंतराव नाईक कृषिभूषण २०१३

## गो-विज्ञान अनुसंधान व बहुउद्देशिय संस्था, भुसावळ

### श्री. प्रभाकर मुरलीधर उपाख्य बापूराव मांडे -- अध्यक्ष

### प्रकल्प क्षेत्र - हरिपुरा, ता.यावल, जि. जळगाव



५

- नांगर चालणार नाही अशा दगडी माळरानावर संस्थेची वृक्ष लागवड.
- पाणी अडविण्यासाठी १४ चर खोदले असून नाल्यावर १०० फूट लांब सिमेंटचा बंधारा.
- जमिनीतील पाण्याची पातळी वाढण्यासाठी शिरपूर पॅटर्न.
- संस्थेची गोशाळा असल्यामुळे गाईने खाऊन उरलेल्या चारा, कुट्टी व शेण यापासून गोबर गॅस तसेच छोटया छोटया बायोगॅस प्रकल्पांची उभारणी.
- संस्थेच्या प्रकल्पामध्ये गांडूळ खत, निंबोळी अर्क, निंबोळी पेंड तसेच मृत गाईच्या शिंगापासून तयार केलेल्या खताचा वापर.
- आतापर्यंत १५००० वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन करुन स्थानिक लोकांमध्ये जनजागृती.
- आदिवासी समाजासाठी मोफत जलसेवा, संस्थेचे अद्ययावत वाचनालय.

# वसंतराव नाईक कृषिभूषण २०१३

## श्री.महादेव बापूराव शेंडकर

### मु.पो. पिंपरी, ता. पुरंदर, जि. पुणे



- एकूण २.३८ हे. क्षेत्र, वडिलोपार्जित जमीन जिरायत व अविकसित असल्याने सुधारित तंत्रज्ञानाचा वापर करुन शेती करण्याचा निर्णय.
- माती परिक्षणाच्या शिफारशींनुसार रासायनिक खते व सुक्ष्म मुलद्रव्यांचा वापर.
- शेतीमध्ये नवनवीन प्रयोग करण्याचे धाडस व यामधूनच सन २०११ मध्ये प्रथमच ग्रीन हाऊस उभारुन कार्नेशन फुलांचे उत्पादन.
- शेतीमध्ये बहुउद्देशिय पॅकहाऊसची उभारणी करुन त्यामध्ये मालाचे पॅंकिंग व ग्रेडिंग केले.
- शासकीय योजनेमधून शेततळयाचा लाभ घेऊन उन्हाळयातील पाणी टंचाईवर मात.
- बाजारपेठेचा अभ्यास करुन बाजारात ज्या उत्पादनाची मागणी आहे त्याचे उत्पादन घेऊन चांगले उत्पन्न मिळविण्यात यशस्वी.

# वसंतराव नाईक कृषिभूषण २०१३

## श्री. श्रीराम सखाराम गाढवे

### मु.पो.आर्वी, ता. जुन्नर, जि. पुणे



७

- भाजीपाल्याची रोपे तयार करण्यासाठी शेणखत, गोवरी बेडमध्ये अंथरुन रोप तयार करण्याची पध्दत विकसित तसेच गोमूत्र, वेखंड पावडर, वावडिंग पावडर, काळी मिरी पावडर, हिरवी मिरची व लसूण पेस्ट व गूळ १५ दिवस रापवून पिकावर फवारण्याचे वेगळे तंत्र विकसित.
- गावोगावी जाऊन शेतक-यांचे कृषिगट तयार करुन जुन्नर तालुका फार्मर्स प्रोडयुसर कंपनी लिमिटेडची स्थापना व शेतकरी ते थेट ग्राहक भाजीपाला विक्रीसाठी  मुंबई व पुणे येथे अनेक गृहनिर्माण सोसायटींमध्ये उपक्रम सुरु.
- भाजीपाला उत्पादनासाठी प्लॅस्टिक पेपर आच्छादन करणेकरीता गुजरात येथे जाऊन आच्छादन यंत्र तयार केले. जुन्नर तालुक्यात ४०० एकरावर यंत्राद्वारे पहिल्यांदाच प्लॅस्टिक पेपर आच्छादन व श्री हनुमान दुध उत्पादक सहकारी संस्थेची स्थापना.

# वसंतराव नाईक कृषिभूषण २०१३

## श्री. परमेश्वर दगडू राऊत

### मु.पो. पेनूर, ता. मोहोळ, जि. सोलापूर



- आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन डाळींब पिकाचे विक्रमी उत्पन्न.
- राष्ट्रीय फळे व भाजीपाला संशोधन केंद्र, बंगळुरु येथील तंत्राचा वापर करुन केळीचे एकरी ४० टन इतके विक्रमी उत्पादन.
- केळीसाठी सेंद्रिय खताची मात्रा व मशागत पध्दती विकसित करुन न्युट्रीशन गार्डनची संकल्पना रुजविली.
- व्यसनमुक्तीसाठी जनजागृती, बेरोजगारांसाठी मार्गदर्शन व या विषयासंदर्भात महत्वपूर्ण कार्य.
- सुक्ष्मसिंचन व सेंद्रिय शेती याबाबत परिसरातील शेतक-यांना मार्गदर्शन
- शेतीव्यवसायाला पूरक दुग्ध व्यवसाय सुरु.

८

# वसंतराव नाईक कृषिभूषण २०१३

## श्री. सबाजीराव महादू गायकवाड

### मु.वाळूंज, पो. बाबूर्डी घुमट, ता.जि. अहमदनगर



- पडीक व कोरडवाहू जमिनीवर वेगवेगळया पिकांच्या जास्तीतजास्त उत्पादनासाठी अनेक प्रयोग राबवून सिंचन पध्दती आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा काटेकोर वापर या विषयाचा अभ्यास.
- सिंचनाची नवीन पध्दत विकसित, या पध्दतीव्दारे पाटपध्दतीने लागणा-या पाण्यापेक्षा ५० टक्के पाणी कमी लागत असल्याने ओलिताखाली क्षेत्रात वाढ करता येणे शक्य.
- मिठाच्या द्रावणाचा किटकनाशक व तणनाशक म्हणून वापर करण्याबाबतचा अत्यंत नाविन्यपूर्ण किफायतशीर प्रयोग.
- कृषिविषयक अभ्यासाच्या दृष्टीकोनातून विविध अभ्यासदौरे, सिंचन पध्दतीच्या व पाण्याच्या वापराबाबतच्या अभ्यासासाठी इस्त्राईल येथे दौरा.
- आधुनिक तंत्रज्ञान शेतक-यांपर्यंत पोहचविण्यासाठी परिसरातील शेतक-यांना शेतावर बोलावून दर महिन्याच्या ५ तारखेला विनामूल्य मार्गदर्शन व महाराष्ट्र राज्याच्या विविध भागातील शेतक-यांसाठी दरवर्षी फेब्रुवारी महिन्यात स्वत:चे शेतावर शेतकरी मेळाव्याचे आयोजन.

# वसंतराव नाईक कृषिभूषण २०१३

## श्री. विजय पंडीतराव जाधव

### मु.पो.सांगवीभुसार, ता.कोपरगाव, जि. अहमदनगर



- एकूण १०.२१ हेक्टर शेतजमीन, शिक्षण एम एस्सी (कृषी) झाले असून महाविद्यालयीन शिक्षणाच्या वेळी हॉकी या खेळात राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व व संघाचे नेतृत्व.
- पारंपारीक शेती पध्दतीस फाटा देऊन शेतीमध्ये विविध प्रकारच्या तंत्रज्ञानाचा वापर व प्रसार करत कमी खर्चात अधिक उत्पादन काढण्यावर भर.
- शेतावर सामुहीक शेततळयाची उभारणी केली असून शेततळयातील पाण्याचा सुक्ष्म सिंचन पध्दतीव्दारेच वापर.
- संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता समिती तसेच मौनगिरी बचतगटाचे अध्यक्ष.
- दुग्ध व्यवसाय, मत्स्यपालन हे व्यवसाय सुरु केले असून सन २००७-०८ चा आदर्श गोपालक पुरस्कार व दुध उत्पादनात गट पातळीवर प्रथम पुरस्कार.

१०

# वसंतराव नाईक कृषिभूषण २०१३

## श्री. रामनाथ बापूराव वाकचौरे

## मु.पो.वीरगाव, ता.अकोले, जि. अहमदनगर



११

- माती परिक्षणाच्या शिफारशींनुसार रासायनिक खते व सुक्ष्म मूलद्रव्यांचा वापर.
- द्राक्ष छाटणीमध्ये भरघोस व हमखास उत्पादनासाठी गर्डलिंग पध्दतीचा वापर न करता ३ ते ४ पानावर शेंडा खुडून आलेला सबकेन सात-सात पानावर पुन्हा शेंडा खुडून नवीनल सबकेन पध्दतीचा अवलंब करुन द्राक्ष शेती विकसीत.
- द्राक्ष बागेतील ८० टक्के द्राक्षमाल युरोपच्या बाजारात निर्यात, परिणामी भरघोस व निर्यातक्षम उत्पादन.
- पारंपारिक ऊस शेती न करता गावात दुधसंस्था स्थापन करुन दुग्धव्यवसायाला चालना.
- शेती व्यवसायाबरोबर दुग्धव्यवसाय, मत्स्यपालन असे पूरक उद्योग व सामाजिक कार्याची आवड असल्याने नागरिकांचे संघटन करुन पतसंस्था, महिला बचतगट, दुग्धउत्पादक संस्था यांची स्थापना.
- बोअरवेल बंदी व दारुबंदी यासारख्या सामाजिक कार्यात हिरिरीने सहभाग.

# वसंतराव नाईक कृषिभूषण २०१३

## डॉ.श्री. संजय ज्ञानदेव पाटील

## मु.पो.तळसंदे, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर



- तळसंदे येथे २१० एकर जमिन खरेदी करुन पूर्णपणे नापिक असलेल्या माळरानावर विविध प्रकारच्या फळझाडांबरोबर ऊस पिकाची लागण करुन नंदनवन फुलविले व शेतीसाठी लागणारे पाणी मिळावे म्हणून ५ कि.मी. अंतरावर असणा-या वारणा नदीतून उपसा सिंचन योजना करुन पाण्याची सुविधा उपलब्ध केली.
- महात्मा फुले कृषि विद्यापीठ यांचे मान्यतेने कृषि तंत्र निकेतन, कृषि विज्ञान पदवी, कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पदवी महाविद्यालयाची सुरुवात तसेच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचे मान्यतेने तळसंदे येथे दोन मुक्त शिक्षण केंद्राची स्थापना.
- गरीब रुग्णांसाठी राजीव गांधी जीवनदायी योजना कोल्हापूर येथे पद्मश्री डॉ.डी.वाय.पाटील हॉस्पिटल येथे कार्यान्वित.
- वनश्री पुरस्कार, इंदिरा प्रियदर्शनी वृक्षमित्र पुरस्कार, राष्ट्रीय शिक्षण सन्मान पुरस्कार, कोहिनूर ऑफ इंडिया पुरस्कार, मदर तेरेसा पुरस्कार व गोल्ड स्टार आशिया इंटरनॅशनल पुरस्कार अशा अनेक विविध पुरस्कारांनी गौरवित.

१२

# वसंतराव नाईक कृषिभूषण २०१३

## श्री. राजेंद्र सातापा हांडे

## मु.पो.आरग, ता. मिरज, जि. सांगली



- जमीन समपातळीत आणून जमिनीच्या उतार असलेल्या भागात आडवे बांध घालून त्यावर साग, शेवरी तसेच गजराज या गवताची लागवड करुन जमीनीची धूप कमी केली.
- शेतामध्ये एकूण नऊ विहिरी असून सर्व विहिरी पाईपलाईनने जोडून विहीरजोड प्रकल्प.
- ऊसाची पाचट कुट्टी करुन व केळीपाला कुजवून त्यापासून सेंद्रिय खताची निर्मिती व त्याचा वापर.
- प्लॅस्टिक मल्चिंगचा वापर करुन मशागतीवरील खर्च कमी केला.
- निर्यातक्षम केळी उत्पादनासाठी स्कर्टिंगचा वापर करुन गुणवत्तापुर्ण उत्पादन व केळीची निर्यात.
- लेख विविध वर्तमानपत्रे व विविध मासिकांमधून प्रसिध्द.
- अमितसिंग फाऊंडेशन, नवी दिल्ली यांचा कृषि आधुनिकीकरण तंत्रज्ञान व फलोत्पादन प्रेरणादायी शेती याबाबतचा उद्यानरत्न पुरस्कार

१३

# वसंतराव नाईक कृषिभूषण २०१३

## श्री. पोपटराव बाबुराव दापके

### मु.पो. बहिरगाव, ता. कन्नड, जि. औरंगाबाद



- कृषी क्षेत्रामध्ये अनेक प्रयोग करुन टोमॅटो, कांदा, आले, कापूस यामध्ये विक्रमी उत्पादन.
- कृषी उत्पादक गटांनी उत्पादित केलेला शेतमाल ग्रुप मार्केटिंग पध्दतीने विक्री करण्यास सुरुवात.
- आले पिकाचे एकरी ३५१ क्विंटल असे विक्रमी उत्पादन.
- बळीराजा कृषी विकास सेवाभावी संस्था स्थापन करुन सन २००२ मध्ये बाजार माहिती केंद्र सुरु.
- बाजार माहिती केंद्रामुळे गटाने उत्पादित केलेला शेतमाल कन्नड ऐवजी सुरत, औरंगाबाद, जळगाव व नागपूर येथे विक्रीसाठी पाठविण्यास सुरुवात.
- परिसरातील शेतक-यांसाठी कृषि विज्ञान मंडळ स्थापन करुन कृषि ग्रंथालयाची सुविधा उपलब्ध करुन दिली.

१४

# वसंतराव नाईक कृषिभूषण २०१३

## श्री. विजय आण्णाराव नरवाडे

### मु.पो.पार्डी (बु.), ता.वसमत, जि.हिंगोली



१५

- एकात्मिक शेती पध्दतीचा अवलंब करुन त्यामध्ये पिके, फळपिके, दुग्धोत्पादन व कुक्कुटपालन यांचा समावेश.
- शेतामध्ये टिश्युकल्चर रोपांचा जास्तीतजास्त वापर व मिरची, उन्हाळी भूईमुग, टरबूज, काकडी या पिकांसाठी प्लास्टिक मल्चिंगचा वापर.
- शेतामध्ये सुसज्य असा ३० x ६५ फुट आकाराचा जनावरांचा गोठा व त्यासोबतच गावरान कोंबडयांचे संगोपन.
- गांडूळखत निर्मिती युनिट तयार केले असून त्याव्दारे सेंद्रिय खतांची पिकांसाठी उपलब्धता.
- सन २००६ मध्ये पाणी वापर सहकारी संस्थेची स्थापना.
- स्वत:चा बचतगट व इतर शेतकरी गट मिळून एक शेतकरी संघ स्थापन व त्याव्दारे पपईची विक्री व्यवस्था स्वतंत्रपणे सुरु.

# वसंतराव नाईक कृषिभूषण २०१३

## श्री.अशोक राजेसाहेब देशमुख

### मु.पो. नांदूरा (बु.), ता. अहमदपूर, जि. लातूर



- शेतीमध्ये नवीन प्रयोगाव्दारे ऊस शेतीबरोबरच द्राक्ष लागवड.
- परिसरातील पहिले द्राक्ष उत्पादक शेतकरी म्हणून ओळख.
- शेतीमध्ये शाश्वतता आणण्याच्या दृष्टीने १००० पक्षी क्षमतेचा आधुनिक तंत्रज्ञानाचा सुसज्य असा पोल्ट्री फार्म तसेच २० मु-हा व २० पंढरपूरी म्हशीव्दारे दुग्धव्यवसाय सुरु.
- कृषि विभागाच्या मदतीने वैयक्तिक व सामुदायिक शेततळे तयार करुन स्वखर्चाने २५ लाख लिटर क्षमतेच्या २ सिमेंटटँकची बांधणी.
- महात्मा फुले जलभूमी अभियानांतर्गत तलावातील काढलेला गाळ १० एकर पडीक जमीनीवर टाकून केळी, आले, हळद पिकांचे विक्रमी उत्पादन.
- ऊस पिकामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाव्दारे प्रती एकरी विक्रमी उत्पादन

# वसंतराव नाईक कृषिभूषण २०१३

## श्री.आनंदराव काकासाहेब देशमुख

### मु.पो.ईट, ता.भूम, जि. उस्मानाबाद



- कृषि पदवीधर असून त्यांच्याकडे एकूण ५१.७६ हे. शेतजमीन.
- नवीन बी-बियाणे, शेतीतील आधुनिक तंत्रज्ञान यांचा वापर करुन उत्पन्नात लक्षणीय वाढ करुन परिसरातील अनेक शेतक-यांना आधुनिक तंत्रज्ञानाविषयी माहिती देऊन त्यांच्याही कृषि उत्पन्नात वाढ.
- बँक कर्जाच्या माध्यमातून शेतीसाठी पाण्याची उपलब्धता करुन घेऊन स्वयंचलित ठिबक सिंचन संच २९ एकर ऊस क्षेत्रासाठी कार्यान्वित तसेच ऊसातील पाचट न जाळता त्याच ठिकाणी तुषार सिंचन संचाव्दारे पाणी देऊन कुजविण्याची प्रक्रिया सुरु.
- कृषि विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी व्हाईरस मुक्त पपईचे विक्रमी उत्पादन व बिदरपध्दतीने तूर लागवड करुन तुरीचे भरघोस उत्पादन घेतले.
- सामुदायिक विवाह सोहळयांचे यशस्वीरित्या आयोजन.

१७

# वसंतराव नाईक कृषिभूषण २०१३

## श्री. पांडुरंग साहेबराव आवाड

### मु.पो.शिरपूरा, ता.कळंब, जि.उस्मानाबाद



- सन २००१ पासून ५ फूट रुंद सरीमध्ये एक डोळा पध्दतीने ऊस लागवड करीत असल्याने ४० टनाऐवजी ७० टन उत्पादन.
- ऊसाचे संपुर्ण क्षेत्रास ठिबक सिंचनाव्दारे पाणी दिल्याने एकरी १०४ टनापर्यंत उत्पादन.
- सामाजिक कार्याची आवड तसेच महात्मा गांधी तंटामुक्त अभियानाचे अध्यक्ष म्हणूनही काम.
- लोकमंगल उद्योग समूह, सोलापूरतर्फे ‘ कृषि गौरव पुरस्कार’ २०१०, निखिल शुगर हारदा (मध्यप्रदेश) तर्फे ‘ सन्मानपत्र’ २०१०, नेटाफेम ड्रिप इरिगेशन पुणे तर्फे ‘ कृषिश्री’ २०१२, इ. विविध प्रकारच्या पुरस्काराने सन्मानित.

१८